# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ४२

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांकः-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक १२/१२/२०२५ दुपारी ०४-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ४. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ५. | श्री बाळासाहेब तट्टु | मुख्य लेखाअधिकारी |
| ६. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ७. | श्री सागर जकातदार | सह. आयुक्त |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्री वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| १०. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य. अभियंता बांधकाम |
| ११. | श्री संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्य अधिकारी |
| १२. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. सह. आयुक्त तथा भांडारपाल |
| १३. | श्री संजय मोरे | कार्या.अधिक्षक आस्थापना विभाग |
| १४. | श्री चंद्रकांत मोरे | प्र. लेखापाल लेखा विभाग |
| १५. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १६. | श्री .एन के. बागुल | कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग |
| १७. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १८. | श्री कमलेश सोनवणे | सहा.अभियंता, नगररचना |
| १९. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २०. | श्री मुकेश अग्रवाल | मालमत्ता कर अधिक्षक |
| २१. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २२. | श्री विश्वंभर दासरवाढ | मनपा शिक्षण मंडळ |
| २३. | श्री लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २४. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २५. | श्री गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २६. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-६६५ धुळे महानगरपलिका अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत रामनगर व परिसरात मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे कामी झालेला वाढीव खर्च मनपा निधी अंतर्गत करणेकामी मान्यतेसतव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे महानगरपालिका जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत रामनगर भु. क्र.. ३१४ राममंदिर परिसर व संत नरहरी कॉलनी भु. क्र. १४३३७ मारोती मंदिर या परिसरात मोकळया जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षक भिंत बांधणेकामी प्र. मा. जिल्हाधिकारी सो. यांना तांत्रिक मान्यता रु. ५७,३८,०००/- मात्र प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यानुसार प्र.मा. रु. ५०,०१,०००/- ची दिली होती. त्यात ७,३७,०००/- हे मनपा फंडातुन द्यावे लागणार आहे. याकामी सदरचा प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक बजेट तरतुद आहे का याकामी.

मा.उपअभियंता या बजेटमध्ये करावे लागणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक रिव्हाईज बजेटमध्ये प्रोव्हीजन झाली तरच बिल पुट अप करावे. बजेट प्रोव्हीजन नसेल तर बिल पुट अप करु नये. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४३ दिनांक १२/१२/२०२५**

धुळे महानगरपलिका अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत रामनगर न.भु क्र. ३१४ रामंदिर परिसर व संत नरहरी कॉलनी न.भु.क्र. १४३३७ मारोती मंदिर या परिसरात मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणेचे प्रस्ताव म.जिल्हाधिकारी सो. यांना तांत्रीक मान्यतासह रु.५७,३८,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

त्यानुसार त्या दोन कामांना मा. जिल्हाधिकारी सो. यांनी उक्त संदर्भान्वये प्रशासकीय मान्यता रु.५०,०१,०००/- अन्वये सादर केली होती. परंतु सदरील कामाची निविदा क्र. २४२ DMCD 888102 (१) अन्वये रु.५७,३८,०००/- निविदा प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यशानुसार सदरील कामाची दर मंजुरी होवून त्या कामाचे कार्यादेश जा.क्र. धुमपा/बांवि/३८/२०२३ दिनांक २४/०५/२०२३ व दुसऱ्या कामाचे कार्यादेश जा.क्र.धुमपा/बांवि/१३/२०२३ दिनांक ०२/०५/२०२३ ठेकेदार श्री. भुषण चौधरी यांना देण्यात आले होते.

त्यानुसार त्यांना संपुर्ण निविदा रक्कम ५७,३८,०००/- काम पुर्ण केले असून त्यांना त्या कामाची प्र.मा. ५०,०१,०००/- देयक अदा करण्यात आले असून त्यांचे उर्वरीत देयक रक्कम रु.७,३७,०००/- मात्रचे कामाचे देयक देणे आवश्यक आहे. तरी प्र.मा. व्यतिरिक्त उर्वरीत रक्कम रु.७,३७,०००/- मात्रच्या रक्कमेस मनपा निधी फंडातून मंजुरी देणे कामी मे.स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपलिका अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत रामनगर व परिसरात मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे कामी झालेला वाढीव खर्च मनपा निधी अंतर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर कामी सुधारित अंदाजपत्रकात तरतुद प्रस्तावित करण्यात यावी. तदनंतरच सदर कामाचे देयके अदा करावे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६६६ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी बायोमायनिंग (Legacy Waste Remediation) करणे कामी आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता स्वच्छ भारत अभियान नागरी २.० अंतर्गत जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी शासनामार्फत रु. २,७१,९७,५००/- मात्र किंमतीस प्र.मा. मिळाली आहे. ४९,४५० मेट्रीक टन याचा दर रु. ५५०/- मेट्रीक टन हा रेट शासनानेच ठरवुन दिला होता. त्यानुसार सदर कामी ई निविदा मागवुन त्यात २ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यात २ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यात मे. भाग्यदिप वेस्ट मॅन्टेमेंट प्रा. लि. यांची शे. ०.२५ टक्के कमी दराने वाटाघाटी करीता बोलविले असता त्यांनी शे. १.०० टक्के कमी दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. दरास मान्यतेस्तव सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात किती कॉल केले होते.

मा.कार्य अभियंता फर्स्ट कॉल होता.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात एक सुचना आहे. शासनाचा जीआर असला तरीदोन टेंडर पध्दती बंद करावी. किमान ३ टेंडर पाहिजे. २ टेंडर पध्दती कुठल्याही परिस्थीती मध्ये नको. सेकंड कॉलला २ टेंडर आले तर मी ॲक्सेप्ट करेल. यात पुढे ऑडीटला प्रॉब्लेम येवु शकतो. आता जागेवर किती कचरा आहे.

मा.कार्य.अभियंता जागेवर १ लाखाच्या वर लिगसी वेस्ट आहे. यापुर्वी ८९ हजार मेट्रीक टन व ७५ हजार मेट्रीक टन केले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक अजुन त्यासाठी डी पी आर प्रस्तावित केले आहे का.

मा.कार्य.अभियंता त्यासाठी डी पी आर पाठवला आहे २७ कोटीचा.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता हे डम्प केलेले वेस्ट आहे. त्याचे बायोमायनिंगचे किती अंतर आहे.

मा.कार्य.अभियंता त्याच जागेवर बायोमायनिंग करणार आहोत. त्याला मार्किंग करुन सुरु करणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक लिगसी वेस्ट आहे, त्यावर बायोमायनिंग करेपर्यंत मध्ये काही वेगळा खर्च लागणार आहे का.

कार्य. अभियंता सर्व खर्च त्याकडुन करुन घेणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक याचे व्हेईंग ब्रिज कुठे असणार आहे. त्याचे रेकॉर्ड किपींग कसे असणार आहे.

मा.कार्य अभियंता आपल्याकडे जे व्हेईंग ब्रिज आहे तेथेच होणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात प्रॉपर व्हेईंग ब्रिजचे रेकॉर्ड पाहिजे. त्याच्या पावत्या कंसिडर केल्या जाईल. क्युबिक मिटर कंसिडर केले जाणार नाही. तसेच व्हेईंग करतांना मनपाचा कर्मचारी सोबत पाहिजे. व्हेईंगच्या पावत्यानुसार फी दिली जाईल.सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४४ दिनांक १२/१२/२०२५**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी बायोमायनिंग (Legacy Waste Remediation) करणे बाबतच्या कामास शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०२५/CN1212139/नवि-३४ दि.२६/०८/२०२५ नुसार उक्त

कामाच्या खर्चास रक्कम रु.२,७१,९७,५००/-मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तसेच सदर कामास मा.अधीक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,जळगाव यांचे पत्र क्र.७९३/२०२५ दि.२९/०५/२०२५ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून खालीलप्रमाणे निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.रत्नप्रभा फॅसिलीटी सर्व्हिसेस LLP | शे.४% जास्तीने | |
| **२** | **मे.भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.** | **शे.०.२५% कमीने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.**यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २,७१,२९,५०६/-इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराच्या शे.०.२५% कमीने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे. भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. यांना जा.क्र./धुमपा/बां.वि./३९७ दि.०३/१२/२०२५ अन्वये दरवाटा घाटी पत्र दिले असता, त्यांनी दि.०४/१२/२०२५ रोजी लेखी पत्र देऊन अंदाजपत्रकीय दराच्या **शे.१.०० % कमी दराने** काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे. त्यानुसार सदरचे दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी बायोमायनिंग (Legacy Waste Remediation) करणे कामी वाटाघाटी अंती **मे.भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.** यांच्या **शे.१.०० % कमी दराने** आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी योग्य नोंदी घेणे आवश्यक राहिल.यासाठी वजनकाटयावरील नोंदीप्रमाणेच देयके अदा करण्याची कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६६७ धुळे महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातील रद्द करण्यात आलेल्या ठेक्यातील अत्यावश्यक १२० कार्यरत कर्मचारी यांचे नोव्हेंबर २०२५ मानधन अदा करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — हा विषय कार्य.अभियंता यांचा आहे. ते ऑफिस कामासाठी बाहेर गेले आहेत. यात पाणीपुरवठयासाठी निविदा मागविली होती. मे. सावित्रीमाई सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांना ठेका दिला होता. परंतु त्यांनी ६-६ महिने कर्मचाऱ्यांचे पगार दिले नाही. यामुळे सदरचे कर्मचारी हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने मे. महासभेने नवीन ठेकेदार नियुक्तीपर्यंत मनपा

निधीतुन सदर कर्मचारी यांचे मानधन अदा करणेबाबत निर्देश दिलेले आहे. सदर १२० कर्मचारी यांना नोव्हेंबर २०२५ चा मेहनताना रु. १४,६७७,३६०/- मात्र अदा करावयाचा आहे. सदर खर्च मनपा निधीतुन अदा करणेकरीता मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात कोणते कोणते कर्मचारी आहे.

उपअभियंता यात व्हॉल्वमन, वॉचमन, हेल्पर, ऑपरेटर अशा वेगवेगळया पदांचे कर्मचारी आहेत. यात ४५-४६ व्हॉल्वमन आहेत, बाकी इतर कर्मचारी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे डेली मॉनिटरींग कोण करतात.

मा.उपअभियंता मनपातील कनिष्ठ अभियंता आहे. त्यांच्या अखत्यारीत कामे करतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यांनी प्रमाणपत्र दिले आहे का, मी जबाबदार असेल हे कर्मचारी कामावर हजर होते. अशा स्वरुपाचे भविष्यात याचे ऑडिट झाले तर ज्युनियर इंजिनियर जबाबदारी घेणार का. आपल्याकडे कर्मचाऱ्यांची संख्या प्रचंड दिसते परंतु मी गावात फिरतो, टाक्यांवर व्हिजीट देतो तेव्हा कोणीच दिसत नाही. मग ७००-८०० सफाई कर्मचारी, घंटागाडी कर्मचारी हे गल्लोगल्ली दिसायला पाहिजे. ३ ते ५ दिवसाआड पाणी असेल तर व्हॉल्वमन काय काम करतो. व्हॉल्व किती आहे.

मा.उपअभियंता काही भागात दीड ते दोन दिवस पाणीपुरवठा होतो. एक व्हॉल्वमन ४० ते ४५ व्हॉल्व अ‍ॅटेम्प्ट करतो. पहाटे ५ पासुन रात्री ११ ते १२ पर्यंत कर्मचारी काम करतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक माझी एकच विनंती आहे. मनपा हिताच्या दृष्टीने निविदा कराव्या. हे टेंडर पाहिले तर सुप्रिम कोर्टाच्या गाईड लाईन आहे. बॅकडोअर एन्ट्री नसावी.

मा.मु.ले.प. कोणाची लाईबिलीटी आपण स्वत:हुन ओढावुन घेतो आहे. आणि नियुक्ती करण्याच्या भरपुर पध्दती आहे. त्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टेड करा व नविन टेंडर करावे. हे कर्मचारी कधीपासुन कामावर येत आहे.

उपअभियंता ७-८ महिने झाले.

मा.आयुक्त तथा प्रशासक ७-८ महिन्यात किती टेंडर केले आपण

मा.उपअभियंता एक टेंडर केले होते, ते रदद केले होते.

मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे जे कंट्रोलिंग ऑथोरिटीही ज्युनियर इंजिनियर आहे. त्यांनी जर प्रमाणित करुन दिले आणि जबाबदारी घेतली यांनी पुर्ण वेळ काम केले आहे तर यांचे पुढील मानधन निघतील. हे शेवटचे प्रप्रोजल आहे. याची तात्काळ निविदा करावी. याचे प्लॅन तयार करणे आवश्यक आहे, तेवढेच मनुष्यबळ घ्यावे. तसेच पाण्याच्या टाक्यांच्या बाबतीत एकही टाकीचा परिसर स्वच्छ दिसत नाही. टाक्यांच्या खालीच पाणी साचलेले आहे. यांना जो एरिया दिला आहे त्यात पाण्याच्या टाक्यांची साफसफाई सुध्दा यांची जबाबदारी राहिल. यात स्थायी समितीची ५(२) २ प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. हा विना निविदा विषय आहे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४५ दिनांक १२/१२/२०२५**

मे. सावित्रीमाई सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था, धुळे यांचा मनुष्यबळ पुरविण्याचा ठेका दिनांक २६/०९/२०२४ रोजी झालेल्या प्रशासकीय महासभा क्र. ०७ नुसार प्रशासक ठराव क्र. ७८ अन्वये रद्द करण्यात आलेले आहे. त्यांचे आस्थापनेवरील पा.पु विभागाकरिता काम करणाऱ्या १२० कर्मचारी यांना नोव्हेंबर २०२५ चा मेहनताना रु. १४,६७,३६०/- मात्र अदा करण्याचा आहे.

सदर कर्मचारी हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने मे. महासभेने नवीन ठेकेदार नियुक्ती पर्यंत मनपा निधीतून सदर कर्मचारी यांचे मानधन अदा करणे बाबत निर्देश दिलेले

आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचारी यांचे वेतन पत्रक तयार करण्यात आलेले असून, म.मु.ले.अ. यांचा अभिप्राय होऊन पुढील ठेकेदार नियुक्त होईपर्यंतचे त्यांचा मेहनताना रु. १४,६७,३६०/- मनपा निधीतून अदा करणेकरीता विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातील रद्द करण्यात आलेल्या ठेक्यातील अत्यावश्यक १२० कार्यरत कर्मचारी यांचे नोव्हेंबर २०२५ मानधन अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

याबाबतीत यापुढे उक्त कार्यपध्दतीनुसार देयके अदा करण्यात येणार नाहीत. सुयोग्य नियोजन करुन अत्यावश्यक कर्मचारी पुरविणेसाठी योग्य पध्दतीने नियमानुसार निविदा पध्दती करुन कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६६८ सार्व.बांधकाम विभागाकडून प्राप्त होणाऱ्या निधी साठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय शीर्ष तयार करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता विद्युत धुळे शहरातील जुना आग्रारोड सा. बां. विभागाच्या मालकीचा आहे. या रस्त्याच्या मध्यभागी महावितरण कंपनीच्या एल टी लाईन व एस टी लाईन मध्यभागी उभारणी केली आहे. परंतु शहर सुशोभिकरण व रस्ता रुंदिकरणाच्या दृष्टीने आमदार महोदयांनी या लाईन भुमिगत करण्याबाबत प्रस्ताव दिला होता आणि या कामासाठी सा. बां. विभाग मनपाला १०० टक्के खर्च देणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे डिपॉझिट बेसिस काम आहे. जर तुम्ही काम करुन घेतल सा. बां. कडुन ज्या प्रमाणे पैसे येतील त्याप्रमाणे त्यांना दिले जातील. याच अनुषंगाने एक विषय आहे. बहुतांशी रोडच्या मधोमध लाईट लावले आहे. आणि शहर विद्रुप दिसायला नाही पाहिजे यासाठी वायरींग अंडरग्राऊंड केली आहे. तुम्ही वायरलेस पोल केले आहेत आणि केबल वाल्यांनी सर्व पोलवरुन लाईन टाकल्या आहे. तर त्यांना ७ दिवसांचा अल्टीमेटम द्या. वर्तमान पत्रात जाहीर करा. जर मुदत संपली तर लाईन कापुन टाकाव्या.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४६ दिनांक १२/१२/२०२५**

म. कार्यकारी अभियंता मनपा, धुळे यांचे पत्र धुमपा/वि. वि./ २५२ दि.१७/१०/२०२५ यांच्या पत्रान्वये म.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांना धुळे शहरातील जुना आग्रारोड सा.बां. विभागाच्या मालकीचा आहे. या रस्त्यावर असलेल्या विदयुत पोल मुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहतुक कोंडी होत आहे. तसेच या कारणाने अपघात होत असल्याने नागरिक सुरक्षितते करीता व वाहतुक सुलभ होणे करीता सदरचे विदयुत पोल स्थंलातरीत करणे अंत्यत आवश्यक आहे. सदरचा रस्ता सा. बा. विभाग अखत्यारीतील असल्याने सदरचे काम करणे करीता महावितरण कंपनीकडील संभाव्य कामाच्या अंदाजपत्रकिय खर्चाच्या किमान रु.१.५० कोटी निधी उपलब्ध करून मिळावा यासाठी विनंती पत्र पाठवण्यात आले होते.

त्या अनुषंगाने म.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे यांचे पत्र १५७८ दि.२७/१०/२०२१ पत्रानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना लिहीले असता त्यांनी १००% निधी ठेव अंशदान मध्ये मिळावा म्हणून मागणी केली आहे. या सार्वजनिक बांधकाम विभागाचे सध्या Utility Shifting करिता काम मंजूर नाही अथवा निधीही नाही. या सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावरील खराब लांबीचे सुधारणा करण्याचे प्रस्ताव रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम व अर्थसंकल्पात सादर केलेले आहेत. रस्ते दुरुस्ती कार्यक्रम अथवा अर्थसंकल्पीय कामात Utility Shifting ची तरतूद धरण्यात आली आहे. या रस्त्यावरील प्रस्तावित रस्ते दुरुस्ती कार्यक्रम अथवा अर्थसंकल्पीय काम मंजुर झाल्यावर त्यातील Utility Shifting चा निधी तात्काळ आपणाकडे वर्ग करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

सदर सार्वजनिक बांधकाम विभाग निधी (Utility Shifting) अंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,धुळे यांच्या Technical Cost data नुसार रक्कम रु.१,४९,९३,६२१ /- चे अंदाजपत्रक खर्च प्रस्तावित आहे.सदर काम महावितरण च्या १.३ % सुपरविजस चार्गेस अंतर्गत करण्यात येणार आहे,त्यानुसार महावितरण कंपनी यांना धुळे महानगरपालिका मार्फत म.न.पा जा.क्र /वि.वि./ २४८ व २४९ दि.२४ /११/ २०२५ अन्वये पत्र देण्यात आले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग निधी सन २०२५-२६

| अ.क्र | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | धुळे शहरातील आग्रा नगावबारी ते ITI कॉलेज पावतो,आग्रा रोड सलग्न दसेरा मैदान ते गुरुद्वारा हायवे पावतो LT लाइन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणे. | १,४९,९३,६२१/- |

त्यानुसार धुळे शहरातील आग्रा नगावबारी ते ITI कॉलेज पावतो,आग्रा रोड सलग्न दसेरा मैदान ते गुरुद्वारा हायवे पावतो LT लाइन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणे.बाबत कामासाठी म.न.पा. कार्यकारी अभियंता तांत्रिक मान्यता क्र. ३६ दि.२४/११/२०२५ अन्वये अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु. १,४९,९३,६२१/- मात्र तांत्रिक मान्यता प्राप्त आहे, तरी म.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे पत्रान्वये १०० % सार्वजनिक बांधकाम निधी सन २०२५-२६ अंतर्गत प्रस्तावित आहे .

उक्त कामाला १०० % सार्वजनिक बांधकाम निधी वर्ग होणार आहे त्यानुसार स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, सार्व.बांधकाम विभागाकडून प्राप्त होणाऱ्या निधी साठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय शीर्ष तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचे काम अनामत तत्वावर करण्यात यावे. ज्याप्रमाणात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी प्राप्त होईल त्या प्रमाणानुसार देयके अदा करण्यात येतील. सदरचे काम सुयोग्य पध्दतीने कार्यरत राहिल याची नोंद घ्यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६६९ सार्वजनिक बांधकाम विभाग निधी सन २०२५-२६ अंतर्गत धुळे शहरातील आग्रा नगावबारी ते ITI कॉलेज पावतो, आग्रा रोड सलग्न दसेरा मैदान ते गुरुद्वारा हायवे पावतो LT लाइन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणे कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे देखिल डिपॉझिट बेसीस काम राहिल. यात देखील समान सुचना राहिल. डिपॉझिट बेसिस वर्कचे हेड असेल, ठिक नसेल तर क्रिएट करावे. मनपा फंडावर बर्डन येणार नाही. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४७ दिनांक १२/१२/२०२५**

सार्वजनिक बांधकाम विभाग निधी सन २०२५-२६ अंतर्गत धुळे शहरातील आग्रा नगावबारी ते ITI कॉलेज पावतो,आग्रा रोड सलग्न दसेरा मैदान ते गुरुद्वारा हायवे पावतो LT लाइन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणे [सार्वजनिक बांधकाम विभाग निधी सन २०२५-२६]

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार मान्यता दिलेली आहे. म.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांचे पत्र १५७८ दि.२७/१०/२०२१ पत्रान्वये १००% सार्वजनिक बांधकाम निधी सन २०२५-२६ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. १,४९,९३,६२१/- मात्र खर्चास निधी प्राप्त होणार आहे.

उक्त कामाबाबत विहित पध्दतीने निविदा मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. हेमंत दयाराम सोनवणे. | शे. +२.५० जास्त दराने | |
| २ | मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे | शे. -०.०१ कमी दराने | L1 |
| ३ | मे अंबिका इलेक्ट्रीकल्स ,धुळे | शे. +१ जास्त दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता ठेकेदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. १,४९,९२,१२२/- इतक्या रकमेची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -०.०१ कमी दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ठेकेदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय शे. -०.०१ / कमी / जास्त आहेत. त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची रक्कम रु. १,४९,९२,१२२/- अंदाजपत्रकीय / शे.-०.०१ कमी / जास्त दराने आलेले निविदा दर मान्यतेस्तव स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, सार्वजनिक बांधकाम विभाग निधी सन २०२५-२६ अंतर्गत धुळे शहरातील आग्रा नगावबारी ते ITI कॉलेज पावतो, आग्रा रोड सलग्न दसेरा मैदान ते गुरुद्वारा हायवे पावतो LT लाइन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणेकामी मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -०.०१ कमीने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

सदरचे काम अनामत तत्वावर करण्यात यावे. ज्याप्रमाणात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी प्राप्त होईल त्या प्रमाणानुसार देयके अदा करण्यात येतील. सदरचे काम सुयोग्य पध्दतीने कार्यरत राहिल याची नोंद घ्यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७० सुखवद येथील सोलर प्लांट उभारणी करणेस अडचण ठरणारे वृक्ष कापण्यास व परिसरातील जीर्ण बांधकाम निष्कासित करणेस मान्यता मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता अमृत २.० योजनेअंतर्गत विद्युत व यांत्रिकी कामे करणे याकामाचे कार्यादेश देण्यात आले असुन सदर कामात सुकवद येथे १००० के डब्लु पी क्षमतेचा सोलर प्लँटची उभारणी करणे या कामाचा समावेश आहे. सोलार प्लँटची उभारणी करता पंप हाऊस परिसरातील सोलर बसविणेसाठीच्या जागेत मोठया प्रमाणावर काटेरी झाडी व मोठे वृक्ष आहे. प्लँट उभारणीसाठी सर्व काटेरी झाडी व वृक्ष काढुन जमीन समतल करणे गरजेचे आहे. तसेच परिसरात असलेले पडीत झालेले रुम पाडुन जागा समतल करणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक या सोलर प्लँटमध्ये सर्व सिक्वेन्स घेतले आहे का जसे तो एक सोलार प्लँट केला त्याला सबस्टेशनचे अॅक्टीव्हेशन नाही, यासाठी निधी कुठुन आणणार आहे.

उपअभियंता एस एल टी सी च्या मान्यतेस अधिन राहुन करण्याचे प्रस्तावीत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक एस एल टी सी निधी उपलब्ध करुन देणार नाही. याला किती महिने मुदत देत आहात.

मा.उपअभियंता महिन्याभरात उभा राहिल. १ मेगा वॅटचा प्रोजेक्ट आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक प्लेट उभारल्यावर लगेस एम एस डी सी एल कडुन सप्लाय सुरु होईल.

उपअभियंता लगेच सुरु होणार नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक मग हे उभारुन फायदा काय, सोलर एनर्जी केव्हा क्रिएट होईल.

उपअभियंता जोपर्यंत महावितरणला देत नाही नाही. तोपर्यंत

मा.आयुक्त तथा प्रशासक महावितरणला देण्याचे तुमचे प्लॅनिंग सांगा किती खर्च आहे व कुठुन देणार

उपअभियंता सर्व खर्च मंजुर आहे. सबस्टेशन पण मंजुर आहे. ट्रान्सफॉर्मरची एक्झिस्टिंग डी पी आर मध्ये नव्हती त्यासाठी एस एल टी सी कडे गेले आहे. यासाठी २.५ कोटी खर्च येणार आहे. सर्व एकुण खर्च ९.५० कोटी खर्च आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता यासोबत उरलेल्या गोष्टी कंप्लीट करायच्या. त्याचे प्रॉपर बजेटींग करायचे जर निधी कमी पडत असेल तर मनपा फंडातुन कसे होईल ते बघु आपण. पण अर्धवट प्रोजेक्ट चालणार नाही. या कामासाठी स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी करुन घ्यावी.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४८ दिनांक १२/१२/२०२५**

मे. बडगुजर & कंपनी , नाशिक यांना धुळे पाणीपुवठा योजना अमृत २.० योजने अंतर्गत विद्युत व यांत्रिकी कामे करणे, या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून सदर कामात

सुखवद येथे १००० KWP क्षमतेच्या सोलर प्लांट ची उभारणी करणे या कामाचा समावेश आहे.

मे. बडगुजर & कंपनी , नाशिक यांच्या पत्रानुसार सुखवद येथे १००० KWP क्षमतेच्या सोलर प्लांट ची उभारणी करता पंप हाउस परिसरातील सोलर पॅनल बसविणे साठीच्या जागेत मोठ्या प्रमाणात काटेरी झाडी तसेच काही मोठे वृक्ष आहेत. सोलर प्लांट उभारणी साठी सर्व काटेरी झाडी व छोटे-मोठे वृक्ष काढून जमीन समतल करणे गरजेचे आहे. वृक्षांच्या सावलीने सोलर प्रणाली काम करू शकत नाही. त्यामुळे पंप हाउस परिसरात असलेले मध्यम व मोठी अशी ८-१० वृक्ष कापणे गरजेचे आहे. तसेच परिसरात असलेले व पडझड झालेले कर्मचार्यांसाठीच्या रूम आहेत, तेथील जागा सोलर प्लांट साठी आवश्यक आहे. त्यामुळे त्या रूम पाडून जागा समतल करणे गरजेचे आहे. करिता सुखवद येथे १००० KWP क्षमतेच्या सोलर प्लांट ची उभारणी करता अडथळा येत असलेली वृक्ष कापण्यास व परिसरात पडझड झालेले सदरील बांधकाम सुमारे ३५ वर्षापूर्वीचे असून अत्यंत जीर्ण स्थितीत व विना वापर आहे. करिता जागेच्या उपलब्धतेकरिता सदर इमारत ( कर्मचारी निवासस्थान) पाडणे आवश्यक आहे करिता कलम ४५२ अ च्या (१ अ)व (१ ब)नुसार महानगरपालिका स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, सुखवद येथील सोलर प्लांट उभारणी करणेस अडचण ठरणारे वृक्ष विहीत पध्दतीचा अवलंब करुन कापण्यास व परिसरातील जीर्ण बांधकाम निष्कासित करणेस मान्यता देणेत येत आहे.प्रस्तावातील जीर्ण बांधकामाबाबत संरचनात्मक क्षमता प्रमाणीत करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी अहवाल स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मु.ले.प. दि. ३/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५ या कालावधीतील चार साप्ताहिक लेख्यांचा हा अहवाल आहे. यात विद्युत विभाग व आरोग्य विभाग या दोन विभागाचे लेखा परिक्षण केले होते. यात आरोग्य विभागामार्फत जी औषध खरेदी होते. त्या औषधांचे नाव घेतले जात नाही. तसेच जी औषधी आपल्याला प्राप्त होते. तिची गुणवत्ता प्रमाणित होत नाही. तसेच खरेदी करतेवेळी मागील दराचा व मंजुर दराचा विचार न करता दर मंजुर केले आहे. त्यात बराचसा फरक आहे. तसेच बल्कमध्ये औषधी घेतो त्याचे वाटप रेकॉर्ड ठेवले पाहिजे. ते झालेले दिसुन येत नाही. तसेच विद्युत विभागाच्या बाबतीत इलेक्ट्रीसिटी डयुटी लावली त्याबाबत ती काळजी घ्यावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात जे आक्षेप नोंदवलेले आहेत त्याबाबत दखल घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४९ दिनांक १२/१२/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०३/११/२०२५ ते दि.

०७/११/२०२५ पर्यत तसेच दि.१०/११/२०२५ ते दि. १४/११/२०२५ तसेच दि. १७/११/२०२५ ते दि. २१/११/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २४/११/२०२५ ते दि. २८/११/२०२५ पर्यंत तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला. या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने सादर केलेल्या अर्धसमास पत्रांबाबत तातडीने अनुपालन करण्याबाबत दक्षता घ्यावी.

याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधित विभागांकडून अनुपालनाबाबत आवश्यक ती पूर्तता करावी. तसेच याबाबत लेखापरीक्षण विभागाने संबंधित विभागांशी समन्वय ठेऊन कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७२ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार सी.सी.टी.व्ही कॅमेरे, व्हिडिओ शुटींग,फोटोग्राफी, व अन्य व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे करीता आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही कॅमेरे, व्हिडीओ शुटींग, फोटोग्राफी व अन्य साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे कामाबाबत ईनिविदा मागविण्यात आली होती. त्यातील काही बाबी वगळल्या आहे. यामध्ये सुदाम मुव्हीज, शिरपुर यांच्या दरास मान्यतेस्तव सादर केले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जीईएम पोर्टलवर का नाही घेतले याचे कारण नमुद करावे, पठाण साहेब कॉम्प्युटरचे शॉर्ट टर्म टेंडर काढावे. जीईम पोर्टलवरुन बेस रेट घ्यावे.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५० दिनांक १२/१२/२०२५**

धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक 2025 करीता आवश्यकते नुसार सी.सी.टी.व्ही कॅमेरे, व्हिडिओ शुटींग, फोटोग्राफी, व अन्य व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे कामाबाबत धुळे महानगरपालिका प्रशासकिय महासभा ठराव क्र 167 दि.14/07/2025 अन्वये उक्त कामाबाबत आर्थिक खर्चास मंजुरी देणेत आली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | मे.शुभम कॉम्प्युटर्स,धुळे | L1 |
| 2 | मे.अप्रदिज एन्टरप्राईजेस | L2 |
| 3 | मे.सुदाम मुव्हीज, शिरपुर | L3 |

उक्त बाबत मे.शुभम कॉम्प्युटर्स,धुळे यांचे L1 ॲटम रेट प्रमाणे चे दर तुलनेत कमी आहेत. वरील प्रमाणे L-1 निविदाधारकास कळविले असता दर कमी न करून देण्याबाबत लेखी दिले आहे.तथापी सदरचे काम तातडीचे व मनपा सार्वत्रिक निवडणुक काल मर्यादेचे

असल्याने L2 व L3 निविदाधारकाना दर कमी करून देण्याबाबत कळविले असता मे.सुदाम मुव्हीज यांनी दर वाटाघाटी करून एल-1 निविदाधारकापेक्षा दर कमी करून दिले आहे.काही दर लोकसभा निवडणुकीच्या दरा प्रमाणे करून दिलेले आहे. करीता वाटाघाटी अंती मे.सुदाम मुव्हीज यांचे दर सर्वात कमी आहेत.

सबब कंत्राटदार मे.सुदाम मुव्हीज यांनी सर्वात कमी म्हणजेच ॲटम दरा प्रमाणे वाटाघाटी अंती आलेले निविदा दर मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार सी.सी.टी.व्ही कॅमेरे, व्हिडिओ शुटींग,फोटोग्राफी, व अन्य व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे करीता कंत्राटदार मे.सुदाम मुव्हीज सर्वात कमी म्हणजेच ॲटम दरा प्रमाणे वाटाघाटी अंती आलेले निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.

उक्त कामी एक्स्ट्रा बॅकअप घेणे तसेच वेब कास्टींग मध्ये व्यत्यय येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.अद्ययावत कंट्रोल रुम व तांत्रीक पथक नियुक्त करावे. संवेदनशील केंद्रांवरील वेब कास्टींगबाबत काळजीपुर्वक कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७३ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार मंडप, फनिर्चर, बॅरेगेटीग व अन्य व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे करीता आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता विद्युत यातही वाटाघाटी अंती कमी करुन मे. स्थायी समितीपुढे सादर. तसेच मागील निवडणुकीत याच एजन्सीने काम केले होते.

मा.आयुक्त तथा प्रशासक पेस्ट कंट्रोलिंग करुन घ्यावे स्वच्छता विभागाकडुन ही कार्यवाही करावी. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५१ दिनांक १२/१२/२०२५**

धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक 2025 करीता आवश्यकते नुसार मंडप, फनिर्चर, बॅरेगेटीग व अन्य व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे कामाबाबत धुळे महानगरपालिका प्रशासकिय महासभा ठराव क्र 167 दि.14/07/2025 अन्वये उक्त कामाबाबत आर्थिक खर्चास मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे | L1 |
| 2 | मे.सतिष इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे | L2 |

| | | |
|---|---|---|
| 3 | आई श्री.एकविरा मंडप अॅण्ड डेकोरेटर्स,धुळे | L3 |

उक्त बाबत मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे यांचे L1 अॅटम रेट प्रमाणे चे दर तुलनेत कमी आहेत.

वरील प्रमाणे बाब निहाय तुलनात्मक दरा प्रमाणे मक्तेदारासोबत चर्चा केली असता त्यांनी दिलेल्या पत्रानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुक कामाची व्याप्ती व क्षेत्रफळ जास्त असल्याने त्या नुसार कामाची मागणी ही मनपा निवडणुकी पेक्षा 5 ते 7 पट जास्त असल्याने सदरच्या दराची आमच्या दराशी तुलना होऊ शकत नाही. लोकसभा निवडणुकी करीता असलेले काम मोठया प्रमाणात असल्याने वाहतुक खर्च व मजुर खर्च या मध्ये बचत होते तथापी काही बाबी मध्ये एल-1 निविदाधारकाने दर कमी करून दिले आहेत.

करिता ठेकेदार मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अॅटम दरा प्रमाणे वाटाघाटी अंती आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त अहवालानुसार धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार मंडप, फनिर्चर, बॅरेगेटीग व अन्य व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे करीता कंत्राटदार मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अॅटम दरा प्रमाणे वाटाघाटी अंती आलेले निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.

याकामी सदर कंत्राटदारामार्फत होणाऱ्या प्रत्येक कामाची सुयोग्य नोंद व जीपीएस छायाचित्रे घेण्यात यावीत. व देयकासोबत सादर करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७४ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार वेब कास्टिंग,जी.पी.एस, ट्रकिंग इ. व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे करीता आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता विद्युत सदर कामी देखील दर वाटाघाटी केलेल्या आहे. मागील निवडणुकीत वेबकास्टींग नव्हते. लोकसभेच्या दरापेक्षा कमी दर एजन्सीने दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक तुम्ही आणि सिस्टीम मॅनेजर ही वेबकास्टींग प्रोसिजर समजुन घ्यावी. स्ट्रॉंग रुमचे २४ बाय ७ वेब कास्टींग करावे लागणार आहे. जर वेब कास्टींग मध्येच बंद झाले तर प्रशासनावर अॅलीगेशन येतात. यात इंटरनेट कनेक्टीव्हिटी चांगली असावी. यात २ इंटरनेट प्रोव्हायडर असावे. ती प्रोसेस इंटरप्ट होणार नाही याची काळजी घ्यावी. वेब कास्टींगचा लाईव्ह अॅक्सेस लोकांना घेता येईल, अशी प्रोव्हिजन करुन ठेवा. पारदर्शकपणे वेब कास्टींग झाले पाहिजे. जेव्हापासुन ईव्हिएम मशिन येतात तेव्हापासुन काऊंटींग होईपर्यंतचा बॅकअप असायला पाहिजे. सीसीटीव्ही कॅमेरे नाईट व्हिजनवाले असावेत. त्याचा ही बॅकअप पाहिजे. आयोगाने विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे रिपेअर झाले पाहिजे. तसेच प्रेसरुमलाही अॅक्सेस पाहिजे. संवेदनशील केंद्रावर बॅकअप पाहिजे. डॅशबोर्ड डेव्हलप करावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५२ दिनांक १२/१२/२०२५**

धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक 2025 करीता आवश्यकते नुसार वेब कास्टिंग,जी.पी.एस, ट्रकिंग इ. व्यवस्था भाडे दर करार पध्दतीने घेणे कामाबाबत धुळे महानगरपालिका प्रशासकिय महासभा ठराव क्र 167 दि.14/07/2025 अन्वये उक्त कामाबाबत आर्थिक खर्चास मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | मे.मल्टी कॉम्पुटरर्स सर्विस | L1 |
| 2 | मे.अनुप सर्जिकल्स,जळगांव | L2 |
| 3 | मे.तुलिचित्र | L3 |

उक्त बाबत मे.मल्टी कॉम्पुटरर्स सर्विस यांचे L1 ॲटम रेट प्रमाणे चे दर तुलनेत कमी आहेत.

करिता ठेकेदार मे.मल्टी कॉम्पुटरर्स सर्विस यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. मे.मल्टी कॉम्पुटरर्स सर्विस यांना दरवाटाघाटी करीता समक्ष चर्चेसाठी कळविण्यात आले असता त्यांनी वरील प्रमाणे दरा मध्ये कमी न करण्या बाबत लेखी दिले आहे. परंतु सदरचे दर हे तुलनेत जास्त असल्याने L2 निविदाधारक मे.अनुप सर्जिकल्स,जळगांव यांनी जी.पी.एस ट्रॅकी कामाचे दर L1 दरापेक्षा कमी करून दिले आहे ते खालील प्रमाणे आहेत.

वरील प्रमाणे बाब क्र.3 करीता मे.मल्टी कॉम्पुटरर्स सर्विस यांचे दर व बाब क्र.2 करीता मे.अनुप सर्जिकल्स,जळगांव यांचे दर कमी असल्याने वरील प्रमाणे कामा करीता उक्त प्रमाणे निविदाधारकाना सदर कामी दर मान्यता होणे करीता म.स्थायी समितीकडे सादर आहे. तरी वरील प्रमाणे निवडणुक कामा करीता बाब निहाय 2 मक्तेदाराना दर मंजुरी नुसार कार्यादेश देण्यास मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार वेब कास्टिंग,जी.पी.एस, ट्रकिंग इ. व्यवस्था साहित्य भाडे दर करार पध्दतीने घेणे करीता बाब क्र.3 करीता मे.मल्टी कॉम्पुटरर्स सर्विस यांच्या व बाब क्र.2 करीता मे.अनुप सर्जिकल्स,जळगांव यांचे कमी आलेल्या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषयक्रमांक:-६७५ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार सांऊड सिस्टीम, फोकस, फॅन टयुबलाईट, फोकस, जनरेटर, विदयुतीकरण भाडे दर करार पध्दतीने घेणेकरीता आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — यातही वाटाघाटी करुन दर कमी केले आहे. मागील निवडणुकीपेक्षा ही दर कमी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक प्रत्येक कामाचा मला फोटो पाहिजे. फोटो बघुनच बिले निघतील. सर्वच गोष्टींचे फोटो पाहिजे.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५३ दिनांक १२/१२/२०२५**

धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक 2025 करीता आवश्यकते नुसार सांऊड सिस्टीम, फोकस, फॅन टयुबलाईट, फोकस, जनरेटर,विदयुतीकरण भाडे दर करार पध्दतीने घेणे कामाबाबत धुळे महानगरपालिका प्रशासकिय महासभा ठराव क्र 167 दि.14/07/2025 अन्वये उक्त कामाबाबत आर्थिक खर्चास मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ | कंत्राटदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे | L1 |
| 2 | आई श्री.एकविरा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे | L2 |
| 3 | मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स,धुळे | L3 |

उक्त बाबत मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे यांचे L1 ॲटम रेट प्रमाणे चे दर तुलनेत कमी आहेत.

वरील प्रमाणे बाब निहाय तुलनात्मक दरा प्रमाणे मक्तेदारासोबत चर्चा केली असता त्यांनी दिलेल्या पत्रानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुक कामाची व्याप्ती व क्षेत्रफळ जास्त असल्याने त्या नुसार कामाची मागणी ही मनपा निवडणुकी पेक्षा 5 ते 7 पट जास्त असल्याने सदरच्या दराची आमच्या दराशी तुलना होऊ शकत नाही. लोकसभा निवडणुकी करीता असलेले काम मोठया प्रमाणात असल्याने वाहतुक खर्च व मजुर खर्च या मध्ये बचत होते तथापी काही बाबी मध्ये एल-1 निविदाधारकाने दर कमी करून दिले आहेत.

करिता ठेकेदार मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच ॲटम दरा प्रमाणे वाटाघाटी अंती आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकते नुसार सांऊड सिस्टीम, फोकस, फॅन टयुबलाईट, फोकस, जनरेटर, विदयुतीकरण भाडे दर करार पध्दतीने घेणेकरीता कंत्राटदार मे.न्यु सतिष इलेक्ट्रीकल्स ॲण्ड डेकोरेटर्स,धुळे यांचे सर्वात कमी म्हणजेच ॲटम दरा प्रमाणे वाटाघाटी अंती आलेले निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७६ महाराष्ट्रातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील क्षेत्रातील विदयमान एलईडी पथदिवे देखभाल दुरूस्ती तसेच नवीन एलईडी लाईटस आणि सीसीएमएस चा पुरवठा, स्थापना आणि देखभाल दुरूस्ती (१० वर्ष) साठी राज्यस्तरावर नेमलेल्या निविदाधारक M/S BAC Infratech

PVt.Ltd. यांच्या करारनामा करणेबाबत कार्यवाही करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता याबाबत महाराष्ट्र शासनाने शासनस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था मधील एलईडी पथदिवे व डे टु डे मेंटेनन्स, सी सी एम एस सिस्टीम अॅड ऑन करणेसाठी शासनस्तरावर मक्तेदार नियुक्ती केलेली आहे. तसेच प्रारुप करारनामा व प्रारुप कार्यादेश मनपा स्तरावर स्वतंत्रपणे करण्यासाठी निर्देशीत केले आहे. त्यानंतर मा. प्रधान सचिव यांनी व्हीसी मध्ये दिलेल्या सर्व सुचनांप्रमाणे सर्व मनपांना बंधनकारक केले आहे. त्यानुसार हा विषय मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर सादर केला आहे. सीसीएनए सिस्टीम आहे. त्याबददल कंपनीच्या प्रतिनिधीला बोलावले होते. त्यामध्ये आपण दिलेल्या सुचनांप्रमाणे त्याचे कमांड कंट्रोल मॉनिटरींग ते कंट्रोल रुमला करायचे आहे. त्यासाठी मॉनिटर्स मनपाला प्रोव्हाईड करायचे आहे. तो संगण प्रिंटरसह प्रोव्हाईड करायचा आहे. तसेच टोल फ्री क्रमांक नागरीकांसाठी २४ तास उपलब्ध करुन ठेवायचा आहे. तसेच २४ तास कर्मचारी सुध्दा त्या मक्तेदाराने द्यायचा आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ही एजन्सी शासनाने नेमुन दिली आहे. यामागचे इंटेंशन काय आहे.

मा.उपअभियंता यामध्ये पुर्ण राज्यात एलईडी बसविलेले आहे. आणि सगळीकडे खर्च जो कमी जास्त होतो तर शासनाने दर निश्चीत केले आहे. आणि सीसीएमएस सिस्टीममध्ये प्रत्येक लाईटचे मॉनिटरिंग होणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक माझी वसुंधरा मध्ये जी बक्षिस रक्कम येत त्या रकमेतुन हे काम रु शकतो का.

मा.उपअभियंता विद्युत बक्षिस रकमेत यासाठी ५० टक्के हिस्सा आहे. समजा ५ कोटी आले तर २.५ कोटी मिळेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक जर माझी वसुंधरा मध्ये जर बक्षिस मिळाले तर जो कंपोनंट अनुज्ञेय असेल तर तो यासाठी ठेवावा व मनपावरही बर्डन येणार नाही. मनपाची बचत होवुन शासकीय निधीतुन काम होईल. यात नागरी वस्तीची भाग प्राधान्याने द्यावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५४ दिनांक १२/१२/२०२५**

महाराष्ट्र शासन नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील पत्र जा.क्र.नपप्रसं/एलईडी पथदिवे/प्र.क्र./२०२५/का.८००६ दि.३०/१०/२०२५ नुसार महाराष्ट्रातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील क्षेत्रातील विदयमान एलईडी पथदिवे देखभाल दुरूस्ती तसेच नवीन एलईडी लाईटस आणि सीसीएमएस चा पुरवठा, स्थापना आणि देखभाल दुरूस्ती (१० वर्ष) साठी राज्यस्तरावर नेमलेल्या निविदाधारक M/S BAC Infrateeh PVt.Ltd. या संस्थे बरोबर करारनामा करून कार्यवाही करणे बाबत निर्देश केले आहेत. राज्य शासनाने त्यांच्याकडील कार्यादेश डी.एम.ए/एल.ई.डी स्ट्रीट लाईट/वर्क ऑर्डर/डी.७/७६०४ दि.१०/१०/२०२५ नुसार M/S BAC Infrateeh PVt.Ltd.and M/S Vinci Global Pvt Ltd.(JV) या संस्थेस करारनामा करून कार्यादेश दिला आहे. सदरील कार्यादेशाच्या मुख्य शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१.सर्व संबंधित नगरपालिका/नगरपंचायत्ती व महानगरपालिका यांनी विहित प्रक्रिया पार पाडून स्वतंत्रपणे करारनामा करून कार्यादेश दिल्यानंतर कराराचा कालावधी १० वर्ष राहील व दोन्ही पक्षाची परस्पर संमतीने आणि नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या मान्यतेने हो मुदत आणखी वाढवता येईल.

२.संचालनालय स्तरावर अंतिम केलेले निविदा धारका सोबत तपशीलवार बाबी दरानुसार स्वतंत्रपणे करारनामा करून त्यानुसार कार्यवाही करणे सर्व ड वर्ग महापालिका व सर्व नगरपालिका/नगरपंचायती यांना बंधनकारक राहील.

३.उपरोक्त प्रकल्प संदर्भात शासनाकडून कोणताही निधी उपलब्ध केला जाणार नाही. उक्त नमूद सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या अर्थ संकल्पामध्ये उपलब्ध तरतुदीमधून या प्रकल्पावावत खर्च करावयाचा आहे.

४.स्थानिक स्वराज्य संस्था ईईएसएल सोवत कराराची मुदत संपली असेल किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेने ईईएसएल यांचेकडून करार रद केला असेल तर नवीन एजेन्सी यांचे सोबत करार करण्यात यावा.

५.स्थानिक स्वराज्य संस्थेने नवीन एजेन्सी सोबत कार्यदिश दिलेल्या तारखेपासून सर्व विद्यमान एलईडी पब्लिक लाईटचे देखभाल व दुरुस्ती तत्काळ करणे आवश्यक आहे.

६.ठेकेदारास देखभाल दुरुस्तीचे देयक अदा करताना कार्यादेश व निविदा अटी व शर्ती नुसार मासिक कालावधीसाठी करण्यात यावे.

७.नोडल अधिकारी नेमताना मुख्याधिकारी / आयुक्त यांनी नोडल अधिकारी त्यांचे संपर्क तपशील (Mobile Number) संचालनालयास कळवावे.

८.सदर देयक देणेकरीता मुख्याधिकारी / आयुक्त जबाबदार राहतील तसेच देयक तयार करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी / आयुक्त यांनी नेमलेल्या नोडेल अधिकारी यांची राहील.

९.देखभाल व दुरुस्ती करताना तक्रार नोंदविल्या नंतर ४८ तासात निवारण न केल्यास निविदा अटी व शर्ती नुसार कारवाई करण्यात यावी.

१०.संबंधित सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी (ULB) त्यांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक पथदिवे या प्रकल्पाच्या कामकाजासाठी तक्रार व्यवस्थापन प्रणाली Online ठेकेदार मार्फत कार्यरत करणे आवश्यक आहे तसेच आवश्यक अभिलेख (Records) Offline सुद्धा रजिस्टर मध्ये नोंद करून घ्यावी.

११. ठेकेदाराने तक्रार निवारण केंद्राचा व या कामासाठी नेमलेल्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे संपर्क मोबाईल क्रमांक व ई मेल याची माहिती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस व नगरपालिका प्रशासन संचालनालय कार्यालयास वेळोवेळी कळविणे आवश्यक राहील.

१२.ठेकेदाराकडून प्रत्येक महिन्यात तक्रार निवारण रजिस्टर वर तक्रार धारकाचे समाधानकारक काम पूर्ण केलेले आहे याची स्वाक्षरी सह नोंद घेणे आवश्यक आहे व त्या आधारावर मुख्याधिकारी/ आयुक्त यांनी काम समाधानकारक आहे असे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे व प्रत्येक ६ महिन्यात सदर प्रमाण पत्राची प्रत संचालनालयास सादर करावी. तसेच या कार्यादेशामध्ये १ ते ५५ विविध बाब निहाय कामा करीता दर निश्चित करण्यात आलेले आहेत.सदरच्या कामामध्ये मनपा क्षेत्रात सी.सी.एम.एस पॅनल बसविणे, पथदिव्यांची दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे, नविन एल.ई.डी.पथदिवे बसविणे, नविन पथदिवे संरचना उभारणी करणे इत्यादी कामांचा अंर्तभाव आहे.सदरील कार्यादेशाचा करारनामा मध्ये खालील प्रमाणे शर्ती या मनपाच्या दृष्टीकोनातुन एकतर्फी आसल्याने या बाबत मक्तेदारास समक्ष चर्चेसाठी बोलवणे आवश्य़क आहे.

१.मक्तेदाराचे देयक सादर झाल्या नंतर देयक अदायगी करावयाची आहे.

२.सदरच्या कामी देखभाल दुरूस्तीच्या कामाकरीता ३% वाढनुसार मक्तेदारास दयावयाचे असुन त्या बाबतचे सुत्र निश्चित करण्यात आलेले आहे.

३.सदरच्या कामामध्ये भविष्यात वाद उदभवल्यास सदरचा कार्यादेश विखंडीत करणे किंवा रद करणेच्या बाबतीत शासनाच्या कार्यादेशामध्ये क्र.८ नुसार खालील प्रमाणे करारनामाच्या शर्तीचा भंग होत असल्याने त्या प्रमाणे निश्चिती करण्यात आलेली आहे.

अ)काम करणारे मक्तेदारा यांनी पंरस्पर रित्या कुठली ही पुर्व सुचना न देता काम थांबविल्यास व मनपा नोडल अधिकारी यांनी या बाबत प्रस्ताव सादर करणे.

ब) काम करून घेणारे न.पा/ म.न.पा किंवा काम करणारे मक्तेदार हे आर्थिक दृष्टया सक्षम नसल्यास सदरच्या कामी कार्यादेश रदद करणे.

न.पा/ म.न.पा यांनी मक्तेदारास ९० दिवस पावेतो देयक अदा न केल्यास मक्तेदाराकडुन काम बंद करणे.

क) मक्तेदाराने काम करत्यावेळी अयोग्य साहित्याचा वापर केल्यास व अनाधिकृतपणे चोरी केल्यास किंवा हेराफेरी केल्यास मनपा ने या बाबत मक्तेदाराचा कार्यादेश रदद करण्याबाबतचा अहवाल सादर करणे.

उक्त शासन निर्देशानुसार शासनाने विहित केलेल्या प्रारूप मसुदयानुसार करारनामा व कार्यादेश संबधित मक्तेदारास मनपा स्तरावर स्वतंत्रपणे दयावयाचा आहे.

याबाबत शासनाकडील दि.११/११/२०२५ च्या व्हीडिओ कॉन्फरन्स बैठकीत दिलेल्या सुचना प्रमाणे मक्तेदार प्रतिनिधी यांना समक्ष चर्चेसाठी कळविण्यात आले असता चर्चेमध्ये खालील प्रमाणे मक्तेदार यांनी मनपाकडील शर्ती मान्य केल्या आहेत.

१.मनपा मुख्य कार्यालय येथे कमान्ड़ कन्ट्रोल रूम स्थापित करून सर्व सी.सी.एम.एस चे ॲसेस देणे

२.कन्ट्रोल रूम करीता खालील प्रमाणे साहित्य आस्थापित करणे

अ.५५" ॲन्ड्रॉईड टी.व्ही.स्क्रीन

ब.संगणक २ नग

क.प्रिंटर २ नग

ड.अन्य अनुंषगिक इलेक्ट्रॉनिक साहित्य

३.२४ तासा करीता टोल फ्री क्रमांक व्यवस्था करणे.

४.मध्यवर्ती नियंत्रण कक्षात ३ कर्मचारी २४ तासा करीता नेमणुक करणे.

५.प्रभाग कार्यालया करीता प्रत्येकी १ समन्वयक नेमणे

६.नविन एल.ई.डी स्ट्रीट लाईट बसविताना फक्त Crompton, philips या कंपनीचे पथदिवे बसविणे.

७.सर्व साहित्याचे त्रयस्थ तपासणी मनपा अभियंता यांच्या समक्ष करण्यात यावी तसेच या बाबीची त्रयस्थ तपासणी करून देयकांसोबत त्या बाबतचा अहवाल सादर करणे.

८.काम सुरू झाले नंतर प्रथमत: ज्या भागातील/ क्षेत्रातील सी.सी.एम.एस पुर्णत: बसविण्यात येईल व प्रत्यक्ष कार्यान्वित होईल त्या दिनांकापासुन त्या भागातील पथदिवे दैनंदिन देखभाल दुरूस्तीसाठी हस्तांतरीत होतील व या नंतरच्या ३० दिवस कालावधी नुसार या पथदिव्यांची गणणा नुसार मक्तेदाराचे देयक सादर होईल.

९.मक्तेदाराचे देयक अदायगी होण्यास ९० दिवसानंतर अधिक काळ विलंब झाला तरीही मक्तेदारास एकतर्फी काम बंद करता येणार नाही. तसेच या विलंबापोटी मनपाकडून मक्तेदार कोणताही दंड / व्याज आकारणार नाही.

१०.पथदिवा विलंबाने दुरूस्ती करीता मनपाने निश्चित केल्या प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

सदयास्थितीत धुळे महानगरपालिकेकडील संपुर्ण पथदिवे देखभाल दुरूस्ती व नविन पथदिवे बसविण्याचे काम मनपा स्तरावर वार्षीक करारपध्दतीने दर निश्चित करून मक्तेदारास कार्यादेश दिलेले आहेत. त्यानुसार सदयास्थितीत धुळे शहराच्या विस्तारानुसार ३ भागात ३ मक्तेदार या कामी नेमलेले आहेत.सदरील मक्तेदाराची मुदत जुन २०२६ पावेतो आहे.

| **अ.क्र.** | **मक्तेदाराचे नाव** | **विभाग** | **कार्यादेश क्र व दिनांक** | **कामाची मुदत** |
|---|---|---|---|---|
| १) | मे.ओम श्री.मंगलमुर्ती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | मनपा क्षेत्रातील पांझरा नदी पुर्व पश्चिम किनार उत्तरेकडील भाग वलवाडी,भोकर नकाणे,नगांव हददीपर्यत संपुर्ण देवपुर भागतील सदयास्थितीत असलेले पथदिवे देखभाल दुरूस्ती करणे | ०५ दि.२०/११/२०२५ | नोव्हेबर २०२६ अखेर |
| २) | मे.रेडियन्स इलेक्ट्रीकल्स, धुळे | मनपा क्षेत्रातील पांझरा नदी मोठा पुल, गांधी पुतळा ते आग्रा रोड अवधान हददीपर्यत तसेच बाळापुर गाव हददीपर्यत पुर्वे कडील संपूर्ण शहर भागततील सदयास्थितीत असलेले पथदिवे देखभाल दुरूस्ती करणे व उर्वरीत ठिकाणी नवीन एलईडी पथदिवे लावणे (शहर भाग पूर्व) | ०६ दि.२६/०७/२०२४ | जुलै २०२६ पर्यत |
| ३) | मे.पंडित इलेक्ट्रीकल्स, धुळे | मनपा क्षेत्रातील पांझरा नदी मोठा पुल गांधी पुतळा ते आग्रा रोड अवधान हददीपर्यत तसेच चित्तोड महिदळे मोराणे गाव हददी पर्यत पश्चिमेकडील संपूर्ण शहर उर्वरीत ठिकाणी नवीन एल.ईडी पथदिवे लावणे | ०७ दि.२६/०७/२०२४ | जुलै २०२६ पर्यत |

शासनाने निश्चित केलेल्या व करार केलेल्या मक्तेदाराच्या बाब निहाय दर सदयास्थितीत मनपा स्तरावर सुरू असलेल्या कामाच्या काही दरा पेक्षा जास्त असुन बहुतांश बाबी मनपाच्या सदयास्थितीतील कार्यप्रणालीत नाहीत. तसेच पथदिवे देखभाल दुरूस्ती व सी.सी.एम.एस देखभाल दुरूस्ती चे दर प्रती पथदिवा प्रती महिना या प्रमाणे रू. ११९/- प्रती नग निश्चित केले असुन त्या प्रमाणे प्रती महा देयक पथदिव्यांच्या गणणे नुसार देणे अनिवार्य आहे. या प्रमाणे खालील प्रमाणे प्रती महा व प्रती वर्ष खर्च धुळे महानगरपालिकेस होणे अपेक्षित आहे.

| **For maintenance and repair of existing LED streetlights, as well as supply, installation, and 10-year maintenance of new LED lights and CCMS in all Urban Local Bodies across Maharashtra, the state-level selected contractor is M/s BAC Infratech Pvt. Ltd. and M/s Vinci Global Pvt. Ltd. (JV).”** | | |
|---|---|---|
| **Sr.No.** | **Description** | **Est Amount (Rs)** |
| १ | Comprehensive Operation and Maintenance of existing LED streetlights & CCMS in all ULB's of Maharashtra for the period of ten years as per the scope of work per light per month | २८३६७३२ |
| A | Rate Per Annum | ३,४०,४०,७७८ |
| B | Item rates for retrofitting and new street lights in 1 st year all ULBs of Dhule | ७८७७६६११ |
| | Total (A + B) | ११२८१७३८९ |
| C | Old Items Buyback Sheet | ७२५००८ |
| **Total (A + B)-(C)** | | **११,२०,९२,३८२/-** |

वरील तपशीला नुसार १० वर्षा करीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **For maintenance and repair of existing LED streetlights, as well as supply, installation, and १०-year maintenance of new LED lights and CCMS in all Urban Local Bodies across Maharashtra, the state-level selected contractor is M/s BAC Infratech Pvt. Ltd. and M/s Vinci Global Pvt. Ltd. (JV).”** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Years** | **No. of Street Lights** | | | **Comprehensive Operation and Maintenance of existing LED streetlights & CCMS in all ULB's of DHULE for the period of ten years as per the scope of work Rate Per Annum ( O & M)** | **Item rates for retrofitting and new street lights in all ULBs of Dhule** |
| | **Street Lights** | **१०%** | **Total** | | |
| १ Year (२००३२ + ७९३१ =२७९६३ ) | २००३२ | | २७९६३ | ३४०४०७७८ | ७८७७६६११ |
| २ Year | २७९६३ | २७९६ | ३०७५९ | ५२२६९३८४ | ७८७७६६१ |
| ३ Year | ३०७५९ | २७९६ | ३३५५५ | ५७०२०६८३ | ७८७७६६१ |
| ४ Year | ३३५५५ | २७९६ | ३६३५१ | ६१७७१९८१ | ७८७७६६१ |
| ५ Year | ३६३५१ | २७९६ | ३९१४७ | ६६५२३२८० | ७८७७६६१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ Year | ३९९४७ | २७९६ | ४१९४३ | ७१२७४५७९ | ७८७७६६१ |
| ७ Year | ४१९४३ | २७९६ | ४४७३९ | ७६०२५८७७ | ७८७७६६१ |
| ८ Year | ४४७३९ | २७९६ | ४७५३५ | ८०७७७१७६ | ७८७७६६१ |
| ९ Year | ४७५३५ | २७९६ | ५०३३१ | ८५५२८४७५ | ७८७७६६१ |
| १० Year | ५०३३१ | २७९६ | ५३१२७ | ९०२७९७७४ | ७८७७६६१ |
| | | | | ६७५५११९८७ | १४९६७५५६१ |
| | | | | **८२५१८७५४८/-** | |

वरील प्रमाणे विभागाने सादर केलेल्या तपशीलवार अहवालानुसार तसचे शासनाने निर्देशीत केल्या प्रमाणे महाराष्ट्रातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील क्षेत्रातील विदयमान एलईडी पथदिवे देखभाल दुरूस्ती तसेच नवीन एलईडी लाईटस आणि सीसीएमएस चा पुरवठा, स्थापना आणि देखभाल दुरूस्ती (१० वर्ष) साठी राज्यस्तरावर नेमलेल्या निविदाधारक M/S BAC Infrateeh PVt.Ltd. and Vinci Global Pvt.Ltd या संस्थे बरोबर करारनामा करून कार्यवाही करणे करीता निर्णय होणेस्तव विषय म.स्थायी समितीकडे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावा नुसार तसेच मक्तेदाराने मान्य केलेल्या शर्ती नुसार उक्त कामी खालील प्रमाणे टप्यामध्ये या मक्तेदारास कामा करीता करारनामा करून आदेश करणेस मान्यता देण्यात येत आहे.

१. CCMS-Centralized Control and Maniteance Systems

२. Comprehensive Operation and Maintenance of existing LED

३. New retrofitting and new street lights, CCMS Installation.

विभागाने शासन निर्देशा प्रमाणे व मक्तेदाराने मान्य केलेल्या शर्तीचा करारनामा मध्ये अंतर्भाव करून मक्तेदारास टप्याटप्याने कामा करीता कार्यादेश करावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७७ मानधनावरील औषध निर्माता, स्टाफ नर्स, एएनएम, दाई, वाहन चालक, व पंप चालक, या मानधन कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक ज्यांची नियुक्ती रितसर पध्दतीने झाली आहे. त्यांना मुदतवाढ देणेत येत आहे. तसेच सिस्टिम मॅनेजर बायोमेट्रीक अटेंडंस सुरु करावी. फिल्डवरील स्टाफ फक्त त्यातुन वगळावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५५ दिनांक १२/१२/२०२५**

धुळे महानगरपालिका धुळे येथील औषध निर्माता २, स्टॉफनर्स - ३, ए एन एम - ६, दाई - २, वाहन चालक - १३, पंप चालक - २, असे एकुण २७ मानधन कर्मचारी यांना संदर्भीय क्र.१ च्या आदेशानुसार नियुक्ती देण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी नमुद दिनांक २१/११/२०२५, ७/१/२०२६, १८/१२/२०२५, २८/१२/२०२५ रोजी संपुष्ठात येत आहे.

त्याअनुषंगाने पत्रान्वये खालील ०१ ते २७ मानधनावरील कर्मचारी यांना ०६ महिन्याकरीता एकत्रित मानधनावर नियुक्ती देण्याबाबत विभाग प्रमुखांनी शिफारस केलेली आहे.

तरी उक्त मानधनावरील १ ते २७ कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार प्रस्तावात नमुद एकुण १ ते २७ मानधनावरील औषध निर्माता, स्टाफ नर्स, एएनएम, दाई, वाहन चालक, व पंप चालक, या मानधन कर्मचारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६७८ श्रीमती मनिषा शिवबा महाजन, क्षयरोग कार्यालयातील मानधनावरील कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक श्रीमती मनिषा शिवबा महाजन क्षयरोग कार्यालयातील मानधनावरील कर्मचारी यांनी अर्ज सादर करुन ६ महिने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. तत्कालीन आयुक्त सो. यांनी पतीच्या निधनानंतर सहानुभुतीपुर्वक यांची नियुक्ती केली होती.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५६ दिनांक १२/१२/२०२५**

श्रीमती मनिषा शिवबा महाजन, क्षयरोग कार्यालयातील मानधनावरील कर्मचारी यांनी विनंती.अर्ज सादर करुन पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येम आहे. श्रीमती मनिषा शिवबा महाजन, क्षयरोग कार्यालयातील मानधनावरील कर्मचारी यांना जा क्र/ धुमपा/ आस्था /१३५/ दि ७/५/२०२५ अन्वये एकत्रित मानधन रु. १२०००/- नुसार ६ महिने करीता क्षयरोग कार्यालयाकडे नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची दि ८/११/२०२५ रोजी मुदतवाढ संपुष्ठात आलेली आहे.

प्रशासकीय महासभा ठराव क्र. १६५ दि १४/७/२०२५ अन्वये शहर क्षयरोग दुरीकरण केंद्रातील कंत्राटी कर्मचारी कै. शिवबा नारायण महाजन यांच्या निधनामुळे त्यांच्या पत्नी

अर्जदार श्रीमती मनिषा महाजन यांची मानधन तत्वावर झालेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता दिलेली आहे.

तसेच सदर ठरावामध्ये पुढील ६ महिनेकरीता तथा एनयुएचएम कार्यक्रमांतर्गत भरती प्रक्रिया होईपावेतो मानधन तत्वावर फेर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

श्रीमती मनिषा शिवबा महाजन यांची दि ६/११/२०२५ रोजी ६ महिने करीता मानधनावरील सेवा संपुष्ठात आलेली आहे. क्षयरोग अधिकारी मनपा धुळे यांनी श्रीमती मनिषा महाजन यांना पुढील ६ महिने करीता पुर्ननियुक्ती देणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी उक्त मानधनावरील श्रीमती मनिषा शिवबा महाजन, क्षयरोग कार्यालयातील मानधनावरील कर्मचारी यांच्या अर्जानुसार व विभागप्रमुख यांचेकडील शिफारस अहवालानुसार त्यांना एकत्रित मानधन रु १२०००/- नुसार ६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार श्रीमती मनिषा शिवबा महाजन, क्षयरोग कार्यालयातील मानधनावरील कर्मचारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- ६७९ अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन 2025-26 अंतर्गत प्र.क्र.19 धुळे महानगरपालिका हद्दीतील जुना वडजाई रोड गटार व रस्ता काँक्रीटीकरण करणे बाबतच्या कामी आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा. अभियंता अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.१९ धुळे मनपा हददीतील वडजाई रोड व गटार रस्ता काँक्रिटीकरण करणेकामी मा.जिल्हाधिकारी सो. यांच्या मान्यतेनुसार याकामी निविदा मागविण्यात येवुन त्यात दोन निविदा धारकांनी भाग घेतला होता. त्यात मे. प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा सादर केली आहे. दरास मान्यतेस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर, विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक टाऊन प्लॅनिंग मान्यता आहे का. डीपी ला रस्ता किती, मालकी कोणाची

मा.सहा. अभियंता हो मान्यता आहे. रस्ता मनपा मालकीचा आहे. रस्ता १० मिटर आहे. तेथील अतिक्रमण काढावे लागणार आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५७ दिनांक १२/१२/२०२५**

अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.१९ धुळे महानगरपालिका हद्दीतील जुना वडजाई रोड गटार व रस्ता काँक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका धुळे मा.जिल्हाधिकारी सो. यांनी क्र.जिनिसधु/सांस-१/२०२५-

२६/३६०३९/२/२०२५-PLN दि.२३/११/२०२५ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. १,१९,९८,६१०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ २१३/२०२४-२५ दि.३१/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. १,१९,९८,६१०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | मे.फहाद मिर्झा | शे.२.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रु. १,१९,९८,६१०/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन 2025-26 अंतर्गत प्र.क्र.19 धुळे महानगरपालिका हद्दीतील जुना वडजाई रोड गटार व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे बाबतच्या कामी मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन यांचे सर्वात कमी आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचे काम विकास आराखडयातील नमुद लांबी व रुंदीनुसार करण्यात यावे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- ६८० अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.१९ वडजाई रोड गट नं.१११/२ येथील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड करणे बाबतच्या कामी आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा.अभियंता अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.१९ धुळे मनपा हददीतील वडजाई रोड गट नं. ११/२ येथील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड बांधणेकामी मा.जिल्हाधिकारी सो. यांच्या मान्यतेनुसार याकामी निविदा मागविण्यात येवुन त्यात मे. आशिष एम पटवारी यांची शे. -०.१० टक्के कमी दराने सर्वात कमी दराची निविदा सादर केली आहे. जागा मालकी मनपाची आहे. उतारा काढला आहे. दरास मान्यतेस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर, विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक नगररचनेकडुन मंजुरी मिळाल्याशिवाय कामास सुरुवात करु नये. तसेच कोअर कटींग आणि क्वालीटी कमतरता असु नये.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५८ दिनांक १२/१२/२०२५**

अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.१९ वडजाई रोड गट नं. १११/२ येथील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका धुळे मा.जिल्हाधिकारी सो. यांनी क्र.जिनिसधु/सांस-१/२०२५-२६/३६०३९/२/२०२५-PLN दि.२३/११/२०२५ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **३९,९९,५९९/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ २१४/२०२४-२५ दि.३१/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. **३९,९९,५९९/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.आशिष एम.पटवारी | शे.-.१०% कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | मे.सिद्धेश कन्सट्रक्शन | शे.४.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.आशिष एम.पटवारी यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रु. ३९,९५,६००/- इतक्या रक्कमेचे असून शे.-.१०% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.आशिष एम.पटवारी यांचे दर शे.-.१०% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.आशिष एम.पटवारी यांची शे.-.१०% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर. तसेच कलम ४५२ अ च्या (१अ ) नुसार मे.स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.१९ वडजाई रोड गट नं.१११/२ येथील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड करणे बाबतच्या कामी श्री/ मे.आशिष एम.पटवारी यांचे दर शे.-.१०% कमी या सर्वात कमी दराने निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

सदर कामाच्या बांधकामाबाबत नगररचना विभागाची आवश्यक ती मान्यता घेण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- ६८१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2025-26 अंतर्गत अवधान येथील गट नं.8/1, 8/2 येथील जागेत सभागृह बांधणे बाबतच्या कामी आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा.अभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर)योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्र.क्र.१९ धुळे मनपा हददीतील अवधान येथील गट नं. ८/१, ८१/२ येथील जागेत सभागृह बांधणेकामी मा.जिल्हाधिकारी सो. यांच्या मान्यतेनुसार याकामी निविदा मागविण्यात येवुन त्यात सर्वात कमी दराची निविदा मे. बी.आर. भदाणे बिल्डकॉन एल एल पी यांची ९.९० टक्के जास्तीने आली होती वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे. दरास मान्यतेस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर, विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक नगररचनेकडुन मंजुरी मिळाल्याशिवाय कामास सुरुवात करु नये.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६५९ दिनांक १२/१२/२०२५**

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५-२६ अंतर्गत अवधान येथील गट नं.८/१, ८/२ येथील जागेत सभागृह बांधणे** बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र **क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/९४६/२०२५-२६ दि.२९/१०/२०२५** यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **७९,९४,८२५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./**१७२**/२०२५-२६ **दि.२४/०९/२०२५** अन्वये रक्कम रु. **७९,९४,८२५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.बी.आर.भदाणे बिल्डकॉन एल.एल.पी. | शे. ९.९० % जास्तीने | **जास्तीचे सर्वात कमी दर** |
| २ | मे. हिंद कन्सट्रक्शन | शे. १२.०० % जास्तीने | |
| ३ | मे. प्रतिक पुरुषोत्तम पुरोहित | शे. १३.०० % जास्तीने | |

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.बी.आर.भदाणे, बिल्डकॉन एल.एल.पी.धुळे** यांचे दर शे. ९.९० % जास्तीच्या दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/**मे.बी.आर.भदाणे, बिल्डकॉन एल.एल.पी.धुळे** यांचे दर हे शे.९.९० % जास्तीचे असल्याने उक्त ठेकेदार यांना दर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी वाटाघाटी अंती सदरील दर शे.९.९०% जास्तीने ऐवजी **अंदाजपत्रकीय दराने** करणेस तयार असले बाबत कळविले आहे.

तरी सदरील श्री/**मे.बी.आर.भदाणे, बिल्डकॉन एल.एल.पी.धुळे** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** करणे निविदा दर मंजुरी कामी प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2025-26 अंतर्गत अवधान येथील गट नं.8/1, 8/2 येथील जागेत

सभागृह बांधणेकामी वाटाघाटीअंती **मे.बी.आर.भदाणे, बिल्डकॉन एल.एल.पी.धुळे** यांचे आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाच्या आराखडयांना नगररचना विभागाकडुन मान्यता घेण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**मे. स्थायी समिती बैठकी प्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेले निर्देश**

१)मनपाचे जे प्रस्ताव आपण तयार करतो त्यात टाऊन प्लॅनिंग विभागाची परवानगी घ्यायची असते. प्लॅनप्रमाणे आहे असे त्यांचे रिमार्क असतात तर यापुढे नगररचना विभागाकडे नकाशे जातील तर एलडीपीचा सँक्शननेच फक्त विभागाकडे परत येतील आणी एलडीपी रिमार्क असेल डी सी पी आर नुसार आहेत व जागेबाबत मालकीबाबत वाद नाही असे रिमार्क असेल.

२)अग्निशमन विभागाने साप्ताहिक अहवाल सादर करावा.

३)आरोग्य विभागाने घंटागाडया वापरात आणाव्या त्याला ३ दिवसांचा अल्टीमेटम राहिल. गाडया रिपेअर करुन सुरु कराव्या.

४)बऱ्याचश्या इलेक्ट्रीक मिटरमध्ये महावितरण कंपनीकडुन चुकिची आकरणी होत आहे. त्या भागातील ज्युनिअर इंजिनियरने महावितरण कंपनीशी बोलुन ते दुरुस्त करुन घ्यावे. २ महिन्यांची मुदत असेल, आकारणी सुधारित केली नाही तर वाढीव बिल ज्युनिअर इंजिनियच्या वेतनातुन कपात केली जाईल. याबाबत लेखी पत्र द्यावे.

५)स्थायी समिती व महासभेसमोर जे विषय ठेवायचे असतात. तर विषय पत्र अति.आयुक्त व उपायुक्त थेट स्थायी समिती व महासभेकडे पाठवु शकतात. आयुक्तांनी ज्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. त्या प्रस्तावानुसारच विषय पत्र असावे. ज्या ज्या विभागाचे अति.आयुक्त व उपायुक्त असतील आयुक्तांनी प्र. मा. दिल्यानंतर त्यांच्या सहिने विषय पत्र स्थायी समिती व महासभेसमोर येतील.

६)आर ओ ऑफिसेसची साफसफाई व स्वच्छता करुन घ्यावी.

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**